**<u>फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन</u>**

**<u>भाषा मराठीत पुरावा</u>**

**<u>अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र.०७ ची शपथेवर साक्ष</u>**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः विक्रम विजय फडतरे,

वयः ४५ वर्षे, व्यवसायः नोकरी, पोहवा. ब.क्र.१०८७,

राहणारः वाकण, ता.रोहा, जि.रायगड.

**<u>सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए.एल. पवार यांच्यामार्फत :</u>**

०१ दिनांक २१/१२/२०१८ रोजी रात्री ०८.०० ते दुस–या दिवशी सकाळी ०८.०० या वेळेमध्ये माझी पोलीस स्टेशन, रोहा येथे ठाणे अंमलदार म्हणुन डयुटी होती. मी डयुटीवर हजर असताना कौशल ढवुळकर म्हणजेच फिर्यादीने त्याला आरोपीने मारहाण केल्याचे अनुषंगाने माझेकडे फिर्याद दिली. ती मी नोंदवुन घेतली. त्यावरुन गुन्हा क्र.१७२/२०१८ भा.द.वि. कलम ३२४, ५०६ ची नोंद केली. त्यानंतर मी फिर्यादीला वैदयकीय उपचाराकरीता शासकीय रुग्णालय, रोहा येथे पाठविले.

०२. दिनांक २२/१२/२०१८ रोजी मी शासकीय वाहनाचे चालक व पोलीस कर्मचारी श्री. काळे घटनास्थळी म्हणजेच मौजे सुडकोली येथील दुर्गामाता मंदीर येथे गेलो. त्यावेळी माझेसोबत फिर्यादी व दोन पंच हजर होते. फिर्यादीने आम्हाला घटनास्थळ दाखविले. तेथे फिर्यादीने त्याला आरोपीने व्हॉटअप ग्रुप चॅंटींगचे कारणावरुन त्याचे उजवे गालावर व डोक्यावर हातातील लोखंडी कडयाने मारहाण केल्याचे मला सांगितले. तेथे मी घटनास्थळाची पाहणी केली.

तेथे मी पंचनामा तयार केला. आता मला सदर पंचनामा दाखविण्यात आला. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र.३७** देण्यात येतो.

०३. दिनांक २५/१२/२०१८ रोजी मी आरोपीसह मुददेमाल आणण्याकरीता पुन्हा घटनास्थळी गेलो. त्यावेळी आरोपीने त्याचे घरातील लोखंडी कपाटातील ड्रावरमध्ये ठेवलेले लोखंडी कडे काढुन दिले. सदरील कडे मी खाकी लिफाफयामध्ये टाकुन सिलबंद केले. सदरील कडे मी पोलीस स्टेशनला मुददेमाल कारकुन यांचे ताब्यात दिले. त्याठिकाणी मी मेमोरंडम पंचनामा तयार केला. आता मला सदर पंचनामा दाखविण्यात आला. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे. त्यास यापुर्वी **नि.क्र.३०** देण्यात आली आहे.

०४. पुढे मी गुन्हयाचे तपासादरम्यान फिर्यादीचे शेजारी, चुलते यांची बयाणे नोंदविली. फिर्यादी व्हॉटसअप ग्रुपचा सदस्य असलेल्या ग्रुपच्या झेरॉक्स त्याचेकडुन घेतल्या. त्याअनुषंगाने मी फिर्यादीचे पुरवणी बयाण नोंदविले. फिर्यादीचे वैदयकीय उपचाराचे अनुषंगाने प्रमाणपत्र शासकीय रुग्णालय, रोहा येथे डॉक्टरांना पत्र देवुन मिळविले.

०५. दिनांक २५/१२/२०१८ रोजी पोलीस कर्मचारी श्री. काळे यांनी मेमोरंडम पंचनामा करतेवेळी माझे मोबाईल फोनद्वारे फोटो काढले होते. त्याअनुषंगाने मी त्याचेकडुन पुरावा अधिनियम पुरावा अधि. कलम ६५ब चे प्रमाणपत्र घेतले. प्रस्तुत गुन्हयाचे तपासाअंती आरोपीने घटनेचेवेळी फिर्यादीला लोखंडी कडयाने मारहाण केल्याचे मला निष्पन्न झाले. त्यावरुन त्याचेविरुध्द

दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात आले. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे. आता मला जप्त मुददेमाल वस्तु अ वरील स्टीलचे मनगटी कडे दाखविण्यात आले. ते तेच आहे.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.पी.एच.पाटकर यांचेमार्फत.**

०६. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी सुडकोली येथील रहिवासी आहे, कथीत घटनेचेवेळी फिर्यादी युनिकेम कंपनीमध्ये नोकरी करीत होता, कथीत घटनेचे दिवशी फिर्यादी त्याचे कामावर गेला होता, त्याअनुषंगाने मी फिर्यादीचे कंपनीकडुन तो त्यादिवशी कामावर आल्याबाबत प्रमाणपत्र घेतले नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, गुन्हा फिर्यादी कंपनीतुन आल्यावर घडला होता.

०७. हे म्हणणे खरे आहे की, सुडकोली गाव रोहा शहरापासुन अंदाजे २१ किलामिटर अंतरावर आहे, सदर अंतर वाहनाने पुर्ण करण्याकरीता अंदाजे पाऊण तास लागतो, फिर्यादीचे कथनाप्रमाणे त्याचा एकता मित्र मंडळ सुडकोली नावाचा व्हॉटसअप ग्रुप होता, फिर्यादीचे कथनाप्रमाणे आरोपीने सदर ग्रुपमध्ये भडकविणारी चॅटींग केली होती, त्याअनुषंगाने मी फिर्यादी किंवा आरोपीचा मोबाईल फोन जप्त केला नाही.

०८. हे म्हणणे खरे आहे की, सुडकोली गावातील दुर्गामाता मंदीर अंतर्गत रस्त्यावर आहे, सदर रस्त्याचे पलीकडे प्राथमीक शाळा, त्याचे पुढे मयुर धुमक याचे घर व त्यानंतर फिर्यादीचे घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीचे कथनाप्रमाणे घटनेचे दिवशी तो मयुर धुमकची वाट पाहत दुर्गा मंदीराचे बाहेर थांबला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रस्तुत गुन्हयामध्ये मयुर धुमक याचे

बयाण नोंदविले नाही, मी दुर्गा मंदीराचे आजु बाजुला राहणा–या लोकांची बयाणे नोंदविली नाहीत. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, त्याने फिर्यादीचे नातेवाईकांची बयाणे नोंदविली.

०९. मी फिर्यादीची फिर्याद रात्री १२.३० वाजताचे दरम्यान दाखल केली होती. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीचे कथनाप्रमाणे घटना संध्याकाळी ०६.०० ते ०७.०० चे दरम्यान घडली होती, फिर्याद देण्यामध्ये झालेल्या विलंबाचे अनुषंगाने फिर्यादीने फिर्यादीमध्ये दिले नाही.

१०. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीस कर्मचारी श्री. काळे यांचे बयाण नोंदविले नाही, शासकीय वाहनाचा वापर करतेवेळी लॉगबुकमध्ये नोंद केली जाते, मी प्रस्तुत गुन्हयामध्ये घटनास्थळ व मेमोरंडम पंचनामा करतेवेळी शासकीय वाहनाचा वापर केला आहे, त्याअनुषंगाने लॉगबुकच्या नोंदी दोषारोपपत्राला जोडल्या नाहीत.

११. हे म्हणणे खरे आहे की, दुर्गामाता मंदीराची जागा खुली–मोकळी जागा आहे, तेथे कुणीही येवु–जावु शकते, मेमोरंडम पंचनामा करण्यापुर्वी माझा व पंचांच्या अंगझडतीचे अनुषंगाने पंचनामा मी तयार केला नव्हता, ज्या कपाटामधुन कडे आरोपीने काढुन दिले त्याला कुलुप लावलेले नव्हते, मी मेमोरंडम पंचनामा घटनेनंतर चार दिवसांनी केला, वस्तु अ वरील कडे बाजारामध्ये सहजपणे मिळते.

१२. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्यादीचे पुरवणी बयाण कथीत घटनेनंतर सात महिन्यांनी घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस कर्मचारी श्री. काळे यांनी माझे मोबाईल फोनद्वारे काढले नव्हते.

१३. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २२/१२/२०१८ रोजी मी

शासकीय वाहनाचे चालक व पोलीस कर्मचारी श्री. काळे घटनास्थळी म्हणजेच मौजे सुडकोली येथील दुर्गामाता मंदीर येथे गेलो नव्हतो, त्यावेळी माझेसोबत फिर्यादी व दोन पंच हजर नव्हते, फिर्यादीने आम्हाला घटनास्थळ दाखविले नव्हते, तेथे फिर्यादीने त्याला आरोपीने व्हॉटअप ग्रुप चॅटींगचे कारणावरुन त्याचे उजवे गालावर व डोक्यावर हातातील लोखंडी कडयाने मारहाण केल्याचे मला सांगितले नव्हते, तेथे मी घटनास्थळाची पाहणी केली नवहती, तेथे मी पंचनामा तयार केला नव्हता, आता मला सदर पंचनामा दाखविण्यात आला. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही नाही, दिनांक २५/१२/२०१८ रोजी मी आरोपीसह मुददेमाल आणण्याकरीता पुन्हा घटनास्थळी गेलो नव्हतो, त्यावेळी आरोपीने त्याचे घरातील लोखंडी कपाटातील ड्रावरमध्ये ठेवलेले लोखंडी कडे काढुन दिले नव्हते, सदरील कडे मी खाकी लिफाफयामध्ये टाकुन सिलबंद केले नव्हते, सदरील कडे मी पोलीस स्टेशनला मुददेमाल कारकुन यांचे ताब्यात दिले नव्हते, त्याठिकाणी मी मेमोरंडम पंचनामा तयार केला नव्हता, आता मला सदर पंचनामा दाखविण्यात आला नव्हता, त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही नाही.

१४. हे म्हणणे खरे नाही की, पुढे मी गुन्हयाचे तपासादरम्यान फिर्यादीचे शेजारी, चुलते यांची बयाणे नोंदविली नव्हती, फिर्यादी व्हॉटसअप ग्रुपचा सदस्य असलेल्या ग्रुपच्या झेरॉक्स त्याचेकडुन घेतल्या नव्हत्या, त्याअनुषंगाने मी फिर्यादीचे पुरवणी बयाण नोंदविले नव्हते, फिर्यादीचे वैदयकीय उपचाराचे अनुषंगाने प्रमाणपत्र शासकीय रुग्णालय, रोहा येथे डॉक्टरांना पत्र देवुन मिळविले नव्हते, दिनांक २५/१२/२०१८ रोजी पोलीस कर्मचारी श्री. काळे यांनी

मेमोरंडम पंचनामा करतेवेळी माझे मोबाईल फोनद्वारे फोटो काढले नव्हते, त्याअनुषंगाने मी त्याचेकडुन पुरावा अधिनियम पुरावा अधि. कलम ६५ब चे प्रमाणपत्र घेतले नव्हते, प्रस्तुत गुन्हयाचे तपासाअंती आरोपीने घटनेचेवेळी फिर्यादीला लोखंडी कडयाने मारहाण केल्याचे मला निष्पन्न झाले नव्हते, मी प्रस्तुत गुन्हयाचा तपास केवळ फिर्यादीला पोषक ठरेल अशापध्दतीने केला, श्री. काळे यांनी काढलेले फोटो घटनास्थळाचे नाहीत, फिर्यादी व आरोपी यांचेमध्ये वाद असल्याचे कारणावरुन फिर्यादीने आरोपीविरुध्द खोटी तक्रार दिली होती, मी प्रस्तुत गुन्हयाचा चुकीचा तपास चुकीचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले, फिर्यादीला झालेल्या जखमा तो खाली पडल्यामुळे झाल्या होत्या, मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

उलटपासणी पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

SUNIL SAKHARAM MAHALE
Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2025.03.07 15:21:31 +0530

स्थळ : रोहा.
दि.०७.०३.२०२५.

(एस. एस. महाले)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.